# जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड


वेब साईट :- www.nanded.gov.in  E mail :- nandedrdc@gmail.com

दूरध्वनी क्र. :- 02462-235077/248418  फॅक्स क्र.:-02462-238500

शाखा :- आपातकालीन नियंत्रण कक्ष  जा.क्र. 2020/ आपत्ती व्यवस्थापन/सी आर-


**आदेश**  दिनांक : 14/01/2021

वाचा : 1. प्राण्यांमधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम 2009.

2. Action Plan for Prevention, Control & containment of avian influenza ( Revised 2021)

विषय : **बर्ड फ्ल्यू Avian Influenza**

**बर्ड फ्ल्यू Avian Influenza प्रसार प्रबिंधित करण्यासाठी उपाययोजना करणेबाबत...**

ज्या अर्थी राज्यात काही ठिकाणी **बर्ड फ्ल्यू** Avian Influenza आजाराने कोंबडया दगावल्याचे आढळुन आले असुन सबब रोगाचा प्रसार इतर जिल्हयात व जिल्हातंर्गत इतर ठिकाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि संभावित **बर्ड फ्ल्यू** Avian Influenza चा प्रसार प्रतिबंधीत करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन संदर्भ क्र 1 व 2 मधील तरतुदीनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करने आवश्यक झाले आहे.

त्या अर्थी मी डॉ. विपीन इटनकर , जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी नांदेड जिल्हयात संभावित बर्ड फ्ल्यू Avian Influenza संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी खालील प्रमाणे तालुका निहाय समीती गठीत करुन खालील तक्त्याच्या स्तंभ क्र. 4 मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देत आहे.

| अ.क्र. | पदनाम | समीतीतील पद | जवाबदारी |
|---|---|---|---|
| 01_ | तहसीलदार | अध्यक्ष तथा Incident Commander | • **समीतीच्या कामावर नियंत्रण नियंत्रण ठेवणे**<br>• **बर्ड फ्ल्यु या संसर्गाचा फैलाव होणार नाही या साठी विशेष दक्षता घेणे**<br>• **समीतीच्या कामकाजात समन्वय साधने,आवश्यक साहीत्याचा प्लास्टिक HDPE Bags, ब्लिचिंग पावडर, चुना पावडर इ. पुरवठा करने**<br>• **मृत कुकुट पक्ष्यांचे तलाठी, ग्रामसेवक आणि पशुधन विकास अधिकारी यांचे मार्फत स्थळ पंचनामा करुन घेणे** |
| 03 | पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समीती | सदस्य सचिव | • दैनंदिनी अहवाल संकलित करुन वरीष्ठ कार्यालयास सादर करने<br>• प्रभावित पोल्टी फार्मचे प्रवेशव्दार आणि परीसर 2 टक्के सोडीयम हायपोक्लोराइड किंवा पोटेशियम परमॅग्नेट (2 %<br>NaOH / Kmno4 निर्जतुकीकरण करने<br>• समीतीच्या कामकाजाचे दस्त / लेखे अदयावत ठेवणे |
| 04 | पोलीस निरिक्षक | सदस्य | • प्रभावित पोल्टी फार्मच्या 1 कि.मी. त्रिज्येतील परिसरात नागरीकांच्या हालचालीस, तसेच इतर पक्ष्यांच्या प्राण्यांच्या वाहतुकीस प्रतिबंध करनेसाठी पोलीस कर्मचा- यांची नियुक्ती करने<br>• मृत पक्ष्यांचे विल्हेवाट लावतांना गर्दी होउ नये यासाठी योग्य ती खबरदारी घेणे |

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 05 | तालुका आरोग्य अधिकारी | सदस्य | * मोहीम सुरु होण्यापुर्वी जलद कृती दलातील Rapid Response Team) RRT सदस्यांचे आरोग्य तपासणी करने<br>* आवश्यकतेनुसार पी.पी.ई. किट्स चा पुरवठा करने<br>* आवश्यक औषधसाठा उपलब्ध करुन देणे |
| 06 | उप अभियंता सा.बा. | सदस्य | * मृत पक्ष्यांचे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट (Disposal) लावण्यासाठी जेसीबी व सक्शन पंप, फॉगर मशीन, स्प्रे मशीन व इतर आवश्यक साहीत्य उपलब्ध करुन देणे |
| 07 | पशुधन विकास अधिकारी (संबंधित संस्था प्रमुख) | सदस्य | * कार्यक्षेत्रात जनजागृती करने, यासाठी आवश्यक ते आय.इ.सी. ची निर्मीती करने<br>* या आजारासंदर्भात काय करावे ? आणि काय करु ? नये (Does & Don't) या बाबत सर्वसाधारण नागरीकांपर्यंत माहीती पोचविणेबाबत ई.ची कार्यवाही करने<br>* प्रभावित क्षेत्रांच्या 10 कि.मी. त्रिज्येच्या परिसरातील बाजारावर देखरेख ठेवणे |
| 08 | रेंज फारेस्ट ऑफीसर | सदस्य | * स्थलांतरीत पक्षी, वन्य पक्षी, कावळे ई. मध्ये बर्ड फ्लू चा प्रसार होउ नये या साठी पशुसंवर्धन विभागाशी समन्वय साधुन योग्य त्या उपाययोजना करने |
| 09 | उपअधिक्षक / तालुका निरीक्षक भूमी अभिलेख | सदस्य | * Culling व Survellence Zone चे स्केल मॅप तयार<br>* करने मृत पक्ष्यांची विल्हेवाट लावणेसाठी खास जमीन किंवा इतर योग्य जमीनीची निश्चिती करने |

सदरहू आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

**(डॉ. विपीन इटनकर) भाप्रसे**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड.**

**<u>प्रत माहीतीस्तव सादर</u> :**

1. मा. सचिव, कृषी पशुसंवर्धन व दुग्धविकास आणि मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई 2.
2. मा. आयुक्त, पशुसंवर्धन महाराष्ट राज्य औध पुणे - 67
3. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**<u>प्रतिलिपी आवश्यक त्या कार्यवाहीस्तव</u> :**

1. पोलीस अधिक्षक नांदेड.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड.
3. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, लातुर.
4. उपविभागीय अधिकारी सर्व नांदेड जिल्हा.
5. तहसीलदार सर्व नांदेड जिल्हा.
6. जिल्हा पशु संवर्धन अधिकारी नांदेड.
7. सर्व संबधित.
8. आदेश संचिका.

**(डॉ. विपीन इटनकर) भाप्रसे**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड.**

Scanned with CamScanner